# Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

22nd Sept.2018

## Organizer

**Deparitment of Political Science,**

**Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

## Special Issue published By


Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

**ISSN 2349-638x**

**Peer Review and Indexed Journal**

**Impact Factor 4.574**

**Website www.aiirjournal.com**

**Email :- aiirjpramod@gmail.com**

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 122 | डि .के,डाके | कामगार चळवळींपुढील आव्हाने | 423 To 425 |
| 123 | ज्ञानेश्वर बनसोडे | दहशतवाद : समकालीन जगाची समस्या | 426 To 427 |
| 124 | डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत | भारतीय परराष्ट्र धोरणात पंडीत नेहरूंचे योगदान | 428 To 430 |
| 125 | डॉ. एस. डी. पवार | येमेन राष्ट्रामधील सत्तासंघर्ष | 431 To 433 |
| 126 | **डॉ. विजय जालिंदर देठे** | **भारतीय लोकशाहीसमारील नक्षलवादाचे आव्हान** | 434 To 438 |
| 127 | गजानन विठ्ठल बोधले | स्त्री भृणहत्या : एक आव्हान | 439 To 442 |
| 128 | गंगाधर बालू चव्हाण | सामाजिक समस्या व आव्हाने | 443 To 446 |
| 129 | डॉ. आर. डी. गंगथडे | प्राचीन मराठवाड्यातील प्रमुख व्यापारी मार्ग | 447 To 449 |
| 130 | अशोक रामचंद्र गोरे | भारतातील कौटुंबिक हिंसा – समाजशास्त्रीय अभ्यास | 450 To 451 |
| 131 | महादेव माणिकराव हारगे | 'प्रांतवाद' भारतीय राजकारणसासमोरील एक समस्या | 452 To 454 |
| 132 | डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे | महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा विकास सद्यस्थिती आणि आव्हाने | 455 To 460 |
| 133 | किरण नामदेव गायकवाड | महाराष्ट्रातील राजकरणात जाती अस्मीतेचे आव्हान | 461 To 462 |
| 134 | डॉ. संतोष सुधाकरराव कोटुरवार | सामाजिक शास्त्रासमोरील आव्हाने व सद:स्थिती | 463 To 464 |
| 135 | डॉ. चंद्रकांत कुरणे | विमलाताई बागल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर | 465 To 466 |

# भारतातील कौटुंबिक हिंसा – समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा.अशोक रामचंद्र गोरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रास्ताविक :-**

भारतातील कौटुंबिक हिंसाचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता आणि हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची मोठी संख्या लक्षात घेता, भारतीय संविधानाच्या कलम १४ अन्वये महिलांना भेदभावापासून मुक्ती, कलम १५ अन्वये स्त्री-पुरूष समानता आणि कलम २१ अन्वये जीविताचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे, हा व्यापक हेतू डोळ्यासमोर ठेवून महिलांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ व नियम २००६ संपूर्ण भारतात २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू केला आहे.

कौटुंबिक हिंसाचार कायदा अस्तित्वात आल्यानंतर कायदे महिलांच्या बाजूने आहेत, अशी ओरड झाली. परंतू नंतर ही ओरड हळू हळू कमी झाली. कौटुंबिक हिंसाचारात स्त्रिया मोठ्या संख्येने बळी पडतात. भारतात दरवर्षी १२ ते १५ हजार विवाहिता हुंड्याच्या बळी ठरतात. हुंडाबळीचे सर्वाधिक प्रमाण उत्तर भारत, आंध्रप्रदेश, हरियाणा, महाराष्ट्र, ओरिसा व राजस्थान या राज्यात आढळते.

**कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय?**

कौटुंबिक हिंसाचारामध्ये शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे, धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडित स्त्रीचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे, स्त्रीच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे, महिलांचे स्वतःचे उत्पन्न, स्त्रीधन मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे इत्यादींचा समावेश होतो.

**शोध निबंधाचे उद्देश :-**

१) कौटुंबिक हिंसाचार संकल्पना समजून घेणे.
२) कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप लक्षात घेणे.
३) कौटुंबिक हिंसाचाराचे महिलांवरील परिणाम लक्षात घेणे.
४) कौटुंबिक हिंसाचारा संदर्भात भारतीय काद्याची ओळख करून घेणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना तथ्यांच्या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला आहे. संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्र इ.चा आधार घेण्यात आला आहे.

**गृहितके :-**

१) कौटुंबिक हिंसाचार ही संकल्पना अत्यंत व्यापक आहे.
२) भारतात कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण जास्त आहे.
३) कौटुंबिक हिंसाचारात बळी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे.
४) कौटुंबिक हिंसाचारात कमी प्रमाणात पुरूष बळी पडतात.
५) कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण कमी करण्यास कायदा सक्षम आहे.
६) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचा काही प्रमाणात गैरवापर होत आहे.

**विषय विश्लेषण :-**

भारतात कौटुंबिक हिंसेमध्ये प्रामुख्याने हुंड्याशी संबंधित मारहाण किंवा मृत्यू (हुंडाबळी), पत्नीला मारहाण किंवा हत्या, लैंगिक अत्याचार, विधवा स्त्रियांवरील अत्याचार, वृध्द महिलांवरील अत्याचार या घटना प्रामुख्याने घडत असतात.

भारत सरकारच्या मे २००० च्या अहवालानुसार भारतात प्रत्येक ९० मिनिटांत सरासरी हुंड्याशी संबंधित १ हत्या होते. एका दिवसात सरासरी १६ तर वर्षात जवळपास ६००० पेक्षा जास्त हत्या हुंड्याशी संबंधित होत असतात. विशेषतः मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रमाण कनिष्ठ वर्गीय स्त्रियांपेक्षा जास्त आहे. जवळपास ७० टक्के पीडित स्त्रिया २१-२४ या वयोगटातील असतात. कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींपेक्षा उच्च जातींमध्ये ही समस्या जास्त आहे.

कौटुंबिक हिंसेमध्ये हुंडाबळी प्रमाणेच पत्नीला मारहाण हा घटक देखील महत्वपूर्ण आहे. हिंसक मारहाण, तोंडात मारणे, चावणे, यातना देणे, मारून टाकणे या सारख्या घटनांचा समावेश होतो. पत्नीला मारहाण होण्याच्या विविध कारणांमध्ये प्रामुख्याने व्यसनाधिनता (नशा), पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणे, हुंडा किंवा आर्थिक अपेक्षा, गैरसमज, पत्नीचे आक्षेपार्ह वर्तन, पत्नी पसंत नसणे, कुटुंबातील अन्य सदयांची गैरमर्जी इत्यादी कारणांचा समावेश होतो. भारतीय समाजातील कुटुंबात विधवा स्त्रिया, लहान मुले आणि वृध्द स्त्रियांच्या संदर्भात होणाऱ्या हिंसेच्या घटना हा देखील चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.

**कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत तरतुदी :-**

- कलम १४-संयुक्त समुपदेशन/समझोते या कायद्याच्या अंतर्गत उपलब्ध आहे.
- कलम १८ – कोणत्याही प्रकारची घरगुती हिंसा न करणे, कामाच्या ठिकाणी प्रवेश न करणे, संपत्ती न विकणे.
- कलम १९ – स्त्रियांना घराबाहेर काढणे किंवा त्यांना घरातं राहण्यास अडथळा आणणे.
- कलम २० – पोटगीचे आर्थिक संरक्षण-राहणीमानाच्या दृष्टिने पुरेशी उचित, योग्य आर्थिक रक्कम देणे.
- कलम २१ – मुलांच्या ताब्याचे संरक्षण
- कलम २२ – पिडीत व्यक्तीला झालेली इजा, मानसिक छळ व भावनिक क्लेश यासाठी नुकसान भरपाई देणे.

२००१ च्या आकडेवारीनुसार भारतात पतीकडून छळाचे ९९१३५ प्रकरणे उघडकीस आली आहेत. यावरून ही समस्या किती गंभीर स्वरुपाची आहे हे लक्षात येते.

**निष्कर्ष :-**

१) कौटुंबिक हिंसाचार ही एक सर्वव्यापी सामाजिक समस्या आहे.
२) कौटुंबिक हिंसाचाराचे परिणाम समाजावर होत आहेत.
३) भारतात कौटुंबिक हिंसाचारात सर्वाधिक बळी स्त्रिया आहेत.
४) आधुनिक समाजात कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप बदलत आहे.

**संदर्भ सूची :-**

१) 'भारतातील सामाजिक समस्या'- प्रा.पी.के.कुलकर्णी
२) 'भारतीय सामाजिक समस्या' – प्रा.अशोक गोरे
३) 'आधुनिकता और भारतीय समाज' – डॉ.अंजू शुक्ला